MHYA170011052022

# न्या य नि र्ण य

(आज दिनांक १६/१०/२०२३ रोजी पारीत केला)

आरोपीविरुध्दचे आरोप, अभियोगपक्षाचा पुरावा, आरोपीचा बचाव, कायदयातील तरतुद आणि अनुषंगीक युक्तिवाद विचारात घेता संपरिक्षेचा अभिनिर्णय देण्यासाठी माझ्यासमक्ष उपस्थित झालले विचाराधीन मुद्दे व त्यावरील माझे सकारण निष्कर्ष, मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २४/०९/२०२२ रोजी १२.३० वाजता आरोपी हे मौजे कात्री, ता.कळंब येथे ०९ नग देशी दारु विनापरवाना विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगली असतांना मिळून आले, असे अभियोगपक्षाने सिध्द् केले काय? | ...नकारार्थी. |
| २. | अंतिम आदेश काय ? | ..आरोपीस निर्दोष मुक्त केले. |

## –:: का र ण मि मां सा ::–

**मुद्दा क्र.०१ आणि ०२ करिता :–**

०२. प्रस्तुत प्रकरणातील आरोप सिध्द् करण्याकरिता अभियोगपक्षातर्फे घटनास्थळ व जप्ती पंच सा. क्रं.०१ नामे धनंजय यांची साक्ष नोंदवण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त ईतर कोणत्याही साक्षीदाराची साक्ष नोंदवण्याची तसदी अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेली नाही.

०३. आरोपी विरुध्दचे दोषारोप सिध्द् करण्याकरिता अभियोगपक्षातर्फे अभिलेखावर घटनेच्या दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपी हा देशी दारु विनापरवाना विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगून आला, ही बाब संशयापलीकडे सिध्द् करणे क्रमप्राप्त आहे.

०४. अभियोगपक्षातर्फे घटनास्थळ व जप्ती पंच सा. क्रं.०१ नामे धनंजय यांनी अभियोग पक्षास पुरक साक्ष दिलेली नाही. त्यांनी त्यांच्या साक्षपुराव्यामध्ये कथन केले की, दिनांक २४/०९/२०२२ रोजी पोलीसांनी त्यांना घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याकरिता पंच म्हणून मौजे कात्री, ता. कळंब येथे बोलाविले नाही आणि त्यांच्या समक्ष कोणताही घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला नाही. सदरील पंच साक्षीदार यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यातील मजकूर माहित नसल्याचे कथन केल्यामुळे घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द् झालेला नाही. सबब, घटनेच्या दिवशी मौजे कात्री, ता. कळंब येथे आरोपी हा देशी दारु विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून होता आणि आरोपीच्या ताब्यातून ०९ नग देशी दारु जप्त केली ही बाब सिध्द् होत नाही.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अभियोगपक्षातर्फे फिर्यादी आणि तपासीक अमंलदार यांची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. सबब, फिर्याद सिध्द् झालेली नाही. अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे दिनांक २४/०९/२०२२ रोजी देशी दारु आरोपीच्या ताब्यातून जप्त करण्यात आलेली आहे. परंतू सदरील दारु रासायनिक पृथक्करणाचा अहवाल प्राप्त होणे कामी दिनांक ०३/१०/२०२२ रोजी उपसंचालक प्रादेशिक न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, अमरावती यांना वर्ग केलेले आहे. दरम्यानच्या काळात जप्त मुद्देमाल कोणत्या पोलीस कर्मचारी यांनी हाताळला अथवा कशाप्रकारे सुरक्षित ठेवण्यात आला याबाबतचा कोणताही सक्षम पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच, अभियोगपक्षातर्फे अभिलेखावर जप्त मुद्देमाल ही दारु होती किंवा कसे याबाबत रासायनिक पृथ्थकरणचा अहवाल दाखल करण्यात आलेला नाही. प्रस्तुत प्रकरणातील घटनास्थळ व जप्ती पंच

सा. क्रं.०१ नामे धनंजय यांनी अभियोगपक्षास पुरक अशी साक्ष दिलेली नाही. प्रकरणात ईतर कोणत्याही स्वतंत्र साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. सबब, घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी हा विनापरवाना मौजे कात्री, ता. कळंब येथे ०९ नग देशी दारु विनापरवाना विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून होता ही बाब निसंदेहरित्या सिध्द होत नाही. त्यामुळे मी मुद्दा क्रमांक ०१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्रमांक ०२ च्या उत्तरा दाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

०१. आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) प्रमाणे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, कलम ६५(ई) अन्वये दंडनिय गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

०२. आरोपीने यापुर्वी दिलेले वैयक्तीक बंधपत्र व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

०३. अपीलाचा कालावधी संपल्यानंतर गुन्हयात जप्त करण्यात आलेला मुद्देमाल राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यासाठी सुपुर्द करण्यात यावा.

०४. आरोपीस निर्देशीत करण्यात येते की, फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–(अ)(१) नुसार त्यांनी सहा महिन्यांसाठी त्यांचे रु. १५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र द्यावे.

Abhay Mallikarjun Vibhute

Digitally signed by Abhay Mallikarjun Vibhute
Date: 2023.10.17 15:14:29 +0530

**(अभय म. विभुते),**
**न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,**
**कळंब जि.यवतमाळ**

दिनांक : १६/१०/२०२३
ठिकाण : कळंब.